# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील संवादशास्त्रीय दृष्टिकोन

**प्रा. डॉ. दिनकर माने**
जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

**भानुदास लक्ष्मण दोबाले**
एम.ए.(एम. सी.जे.) एम.फील
जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद मो. 9665789869

**प्रस्तावना** :

अण्णाभाऊ साठे यांचे समग्र जीवन एका धगधगत्या यज्ञ कुंडासारखे होते. त्यांनी अर्पण केलेली साहित्याची समिधा ही लोकक्रांतीचे वाहक बनली. अण्णाभाऊ साठे हे लोक हृदयाशी संवाद साधणारे प्रभावी साहित्यिक होते. व्यथा जाणते ते खरे साहित्य असते असे म्हटले जाते. या दृष्टीने विचार करता अण्णाभाऊंच्या साहित्याचा अभ्यास केला असता त्यातील संवाद शास्त्रीय मूल्य स्पष्ट होऊ शकते. मानवता हा त्यांच्या साहित्याचा संदेश होता. अण्णा भाऊ समाजातील दुःखे आपल्या साहित्यातून प्रतिनिधिक स्वरूपात मांडतात आणि लोक जाणीवा अभिव्यक्त करतात. समाजातील विविध विषयावर अण्णाभाऊंनी आपले साहित्य लिहिले आहे. अण्णा भाऊ ज्या समाजातून आले त्या समाजातील दुःख, दारिद्र्य, वेदना त्यांच्या साहित्यात आपल्याला दिसते. तसेच त्यांच्या साहित्यातील संवाद देखील त्याच पद्धतीने मांडलेला आपल्याला दिसतो. विविध प्रकारचे विषय सारख्याच ताकतीने अण्णाभाऊंनी हाताळलेले आपल्याला दिसतात. तसेच अण्णाभाऊंच्या लेखनात एकाच विषयांमध्ये अनेक विषयाचे संदर्भ बहुलता आढळते त्याचा अंतिम परिणाम म्हणून समाज जीवनातल्या अनेक अंगांना स्पर्श करणारे विषय एकाच वेळी अण्णाभाऊ हाताळताना दिसतात. अण्णाभाऊंच्या साहित्याला जी लोकप्रियता मिळाली ती त्यांचे लिखाण व साहित्यातील संवादामुळे असे म्हणावे लागेल.

**अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील संवाद शास्त्रीय दृष्टिकोन:**

साहित्यातील वैचारिकतेचा संवादशास्त्रीय अभ्यास करताना प्रथम संवादशास्त्र म्हणजे काय हे समजावून घेतले पाहिजे. संवादशास्त्र म्हणजे कम्युनिकेशन सायन्स. त्यातील कम्युनिकेशन हा शब्द कम्युनिस्ट या लॅटिन शब्दापासून बनलेला आहे. ज्याचा अर्थ सहभाग असा होतो. प्रा. मॅक्विल यांच्या मते सहभाग हा संवादाचा आत्मा होय, परंतु सहभागाची प्रक्रिय सर्व पातळीवर समान स्वरूपात घडली पाहिजे. या अभ्यासामध्ये अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा सहभाग समजून घ्यावयाचा आहे. संवादाचे आंतरिक संवाद, आंतरवैयक्तिक संवाद, समहू

संवाद आणि जनसंवाद असे चार प्रकार पडतात. येथे संवादशास्त्राचा अभ्यास करताना आत्मगत संवाद, आंतरवैयक्तिक संवाद, समूह संवाद व जनसंवाद हे चारही प्रकार विचारात घेतले आहेत. तथापि, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून होणारा संवाद हा जनसंवाद या प्रकारात मोडतो.

अण्णा भाऊंच्या साहित्यातून प्रकटलेली आत्यंतिक दारिद्रय, अज्ञानी, उपेक्षित अशी गावकुसाबाहेर राहणारी माणसे तशीच ती दऱ्याखोऱ्यांत आणि रान-माळात राहणारीही आहेत. ज्या समाज व्यवस्थेत ती जीवन कंठतात त्या समाज व्यवस्थेने त्यांची घोर उपेक्षा केलेली आहे. पिळवणूक केलेली आहे. हा पिळला जाणारा समाज दारिद्र्य आणि सामाजिक दास्यत्व यामुळे गंजून गेलेला आहे. भूक ही या माणसांची प्रमुख चिंता आहे. या माणसांच्या ठिकाणी विलक्षण धाडस व सामर्थ्य आहे. ती प्रामाणिक आहेत. कष्टाळू आहेत. म्हणून ती प्रामाणिक पणाने कष्ट करून जीवन जगू पाहतात. तरीही त्यांच्या वाट्याला भाकरी ऐवजी अन्याय आणि अत्याचारच जास्त प्रमाणात येतात. त्यांना चोर दरोडेखोर ठरविले जाते. तेंव्हा मात्र ही सोशिक माणसे एकदम बंड करून उठतात. संघर्षाला सिद्ध होतात. विविध दुःखांच्या खाईत जगण्यासाठी धडपडतात. या धडपडणाऱ्या माणसांच्या जीवनात स्थैर्य नाही. निवांतपणा नाही. सर्व परिचे अभावग्रस्त असे त्यांचे जीवन आहे. यामुळेच कदाचित त्यांच्या ठिकाणी एक प्रकारचे सततचे वखवखलेपणही आढळते. त्यांच्या ठिकाणी असलेले वखवखलेपण कुठून आले? ते का यावे? त्यांच्या भोवतीच्या परिस्थितीमधून, परिस्थिती-मुळेच त्यांच्या ठिकाणी ते वखवखलेपण आलेले असते. ही त्यांच्या इथल्या विषमतेवर आधारित असलेल्या समाजव्यवस्थेने बहाल केलेली देण आहे. सतत संघर्षात राहणारी, झुंजत राहणारी, संकटामागे संकटे झेलणारी ही माणसे परिस्थितीनेच बंडखोर, गुन्हेगार, निर्भिड, रांगडी, आडमुठी बगैरे बनलेली असतात. अण्णाभाऊ साठे यांच्यात असलेल्या विचाराचे व दृष्टिकोनाचे प्रभुत्व आपल्याला त्यांच्या संपूर्ण साहित्यात बघायला मिळते.

**उद्दिष्टे:**

1.अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची रचना अत्यंत प्रभावी आहे.

2. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील संवाद दृष्टिकोन अभ्यासणे.

3. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात क्रांतिकारी विचार आढळतात.

4. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील संवादामुळे ते समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

**महत्व :**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी साहित्य विश्वामध्ये आपल्या लेखणी मधून स्वतःची एक वेगळी प्रतिमा तयार केली. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची रचना अत्यंत प्रभावी होती तसेच अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील संवाद समाजातील शेवटच्या घटकाला ही कळेल अशा पद्धतीचे होते व अण्णाभाऊंच्या समाजातील वास्तववादी दर्शन आपल्या साहित्यातून करत असतानाच क्रांतिकारी विचार त्यांनी आपल्या साहित्यातून समाजापुढे ठेवले. त्यामुळे त्यांचे साहित्य लोकप्रिय झाले व समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले या सर्व गोष्टीचा शोध घेण्यासाठी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील संवाद शास्त्रीय दृष्टिकोन हा विषय संशोधनासाठी महत्त्वाचा आहे.

**सारांश:**

सदरील शोधनिबंध साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे  यांच्या साहित्यातील संवाद शास्त्रीय दृष्टिकोन या अनुषंगाने आहे. अण्णाभाऊ साठे यांनी आपले संपूर्ण जीवन संघर्षमय रीतीने जगत आपल्या साहित्याच्या माध्यमातून साहित्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. जन्मापासूनच हालाखीची परिस्थिती असताना देखील येणाऱ्या प्रत्येक संकटावर मात करीत अण्णाभाऊ साठे यांनी साहित्य क्षेत्रामध्ये प्रचंड लिखाण करीत आपले नाव आजारावर केले आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील संवाद व दृष्टिकोन यामुळे त्यांचे साहित्य समाजातील तळागाळापर्यंत पोहोचले व ते लोकप्रिय बनले. अण्णाभाऊ साठे हे एक अभिनेते, कवी, लेखक,नाटककार तसेच समाजसेवक होते.  मराठी बरोबरच 22 परकीय भाषेत त्यांच्या साहित्याचे भाषांतरे झाले आहेत. यावरून त्यांच्या साहित्यातील कार्य आपल्या लक्षात येते.

**निष्कर्ष :**

शतकाच्या पलीकडे डोकवते ते खरे साहित्य असते असे कार्ल मार्क्सने म्हटले आहे. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य शंभर वर्षे झाले तरी अजूनही तेवढेच ताजे आहे. त्यामुळे त्यांचे साहित्य हे जनसंवादाचे साधन बनले आहे. वैचारिकता हा साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा आत्मा होय. साहित्य हे जनसंवादाचे साधन असते. कारण साहित्यातून प्रकट होणारे विचार हे काळाच्या पलीकडे जाऊन टिकतात व ते लोकमानसावर प्रभाव टाकतात. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात विविध सामाजिक समस्येचा व तळागाळातील दुःखांची मांडणी विविध पैलूंच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. त्यांच्या लेखणीमध्ये सामान्य माणसाच्या भावभावनांचा सर्वसामावेशक विचार केलेला आढळतो. भारतीय संस्कृती व परंपरा त्यांच्या मनात परिपूर्ण भिनलेली होती. देव,दैव व दैववाद या धर्मपंथांच्या भोवती पसरलेली भाकड परंपरा व समाजातील विकृती यावर

घाला घालून बदल घडवून आणण्याचे काम अण्णाभाऊंच्या साहित्यातून होते. अण्णाभाऊंच्या साहित्यात नैतिक मूल्यावर भर दिलेला आहे. त्यांच्या साहित्याचा संवादशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केल्यानंतर खालील प्रमाणे निष्कर्ष प्राप्त होतात.

- अण्णा भाऊ साठे यांनी समाजात वैचारिक दृष्टीने एक नवे वादळ तयार केले. त्यांच्या विचारांना साम्यवादी क्रांतीची धार होती. त्याबरोबरच भावनिक दृष्टीने त्यांनी आंबेडकरी चळवळीशी नाते जोडले. त्यामुळे त्यांच्या विचारांचे लोकशाहीकरण होत गेले.
- अण्णा भाऊ साठे यांच्या फकिरा मधील नायक हा उपेक्षित समाजाचे प्रतिनिधित्व करतो. त्याची होरपळही त्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात प्रभावीपणे व्यक्त केली आहे. शिवाय त्यांनी लिहिलेल्या कथा, कादंबऱ्या, लोकगीते, पोवाडे, प्रवासवर्णन यासगळ्यांचा अभ्यास केल्यास एक गोष्ट स्पष्ट होते की, हे सर्व साहित्य त्यांनी महाराष्ट्र समाजाला हालविण्यासाठी लिहिले व त्यांच्या साहित्यातून संपूर्ण महाराष्ट्राची क्रांतीकारी चळवळ यशस्वी झाली. त्यांच्या साहित्याचे हे वैचारिक मूल्य लक्षात घेता असे दिसते की, पुन:प्रत्ययाचा आनंद घेण्याचे सामर्थ्य त्यांच्या साहित्यात होते. त्यामुळे या साहित्याचे जनसंवादमूल्य हे मानवतेवर आधारलेले असून, त्याआधारे त्यांच्या वैचारिकतेची येथे जनसंवाद दृष्टीने मीमांसा केली आहे. जनप्रवाह हा अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा केंद्र बिंदू होता.
- अण्णा भाऊ साठे यांची संवादकौशल्ये प्रत्यक्ष सामाजिक अनुभवावर आधारलेली होती. ते ज्या प्रकारचे संघर्षमय जीवन जगत होते तेच त्यांनी आपल्या कथा-कादंबरीतून मांडले आहे.
- त्यांच्या साहित्याची रचना अभ्यासल्यास कादंबरी हा सर्वात लोकप्रिय प्रकार दिसतो. त्यातही फकिरा या कादंबरीने त्यांना केवळ मराठीतच नव्हे तर विश्व साहित्यात अमर केले आहे.

**संदर्भ सूची :**

1. साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे निवडक वाङमय (२-कादंबरी खंड),
2. अण्णाभाऊ साठे साहित्य आणि समाज परिवर्तनविठ्ठल भंडारे .प्रा -
3. साठे अण्णाभाऊ मॅजेस्टिक बुक स्टॉल आवृत्ती चौथी ,वैजयंता –
4. लोकनाट्य साहित्य आणि कला, प्रा. यशवंत मनोहर
5. अण्णाभाऊंची कथाविश्व - नामदेव व्हटकर